176

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

---

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १८/१०/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.अेपीओ- ३६२२/प्र.क्र.१०५/ पोल-३, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३.

**विषय :-** राज्यातील पोलीस आयुक्त, लोहमार्ग व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग अंतर्गत पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळाचे प्रमाणपत्र / निकष ठरविणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. अेपीओ- ३६२२/ प्र.क्र.१०५/ पोल-३, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१०१६१७१७२७८१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
कार्यासन अधिकारी, का.क्र. ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

राज्यातील पोलीस आयुक्त, लोहमार्ग व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग अंतर्गत पोलीस ठाणेकरिता मनुष्यबळाचे प्रमाणक/निकष ठरविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३६२२/प्र.क्र.१०५/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२३.

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय, Government of Bombay, Home Department Resolution No. PRS-५३५९/५७-V Sachivalaya, Bombay-३२ Dated २३rd January, १९६०.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक : पोमसं/धोरण/४४/ नविन पो. ठाणे मनुष्यबळ निकष/०२/२०२२/२५२, दिनांक १६/०९/२०२२.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्रमांक : पोमसं/धोरण/४४/ नविन पो. ठाणे मनुष्यबळ निकष/०२/२०२२/२९६, दिनांक २४/११/२०२२.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या पोलीस ठाण्यांमध्ये संदर्भाधीन क्र.१ च्या दिनांक २३ जानेवारी, १९६० द्वारे ठरवून दिलेल्या निकषांच्या आधारे मनुष्यबळ कार्यरत आहे. तसेच उक्त शासन निर्णयानुसार राज्यातील विविध घटक कार्यालयाकडून पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास पोलीस ठाणे निर्मितीचे प्रस्ताव सादर केले जातात.

सन १९६० च्या शासन निर्णयामध्ये लोहमार्ग पोलीस ठाण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ निकष स्वतंत्रपणे ठरविण्यात आले नव्हते. परंतु सद्यस्थितीत नवीन तंत्रज्ञानयुक्त भारतीय रेल्वेची वाढती वाहतुक व्यवस्था, प्रवाशांची वाढती संख्या, तसेच गुन्ह्यांची संख्या विचारात घेता लोहमार्ग पोलीस ठाण्यांसाठी स्वतंत्रपणे मनुष्यबळ निकष ठरविणे आवश्यक आहे.

त्यानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने संदर्भाधीन क्र.२ व संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, लोहमार्ग व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग अंतर्गत पोलीस ठाणे निर्मितीचे प्रमाणक फेरतपासणी करुन सुधारित मनुष्यबळ प्रमाणक/निकष प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

भारतीय रेल्वेचा विस्तार दिवसेंदिवस वृद्धींगत होत असून, प्रवाशांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा भाग म्हणून लोकल/मेल/एक्सप्रेसच्या संख्येत व प्रवाशांमध्ये झालेली वाढ तसेच मालवाहतुकीच्या प्रकारात देखील आमुलाग्र बदल झालेला आहे. उदा.रो-रो सेवा, गुन्ह्यांचे स्वरुप व संख्या, तिकीटांचा काळाबाजार, ऑनलाईन तिकीट प्रणालीद्वारे होणारे गुन्हे यामध्ये आमुलाग्र असा बदल झालेला आहे. त्याच्या तुलनेत सध्याचे पोलीस मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने, त्यात कालानुरुप बदल करुन लोहमार्ग पोलीस ठाण्यांकरिता सुधारित मनुष्यबळ प्रमाणक/निकष तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

राज्यातील पोलीस आयुक्त, लोहमार्ग अंतर्गत पोलीस ठाण्यांसाठी मनुष्यबळाचे सुधारित निकष/प्रमाणक "परिशिष्ट- अ" नुसार व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग अंतर्गत पोलीस ठाण्यांसाठी मनुष्यबळाचे सुधारित निकष/प्रमाणक "परिशिष्ट-ब" नुसार निश्चित करण्यास यान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सन १९६० च्या शासन निर्णयाचा अभ्यास करुन तसेच लोहमार्ग पोलीस ठाणे हद्दीतील गुन्ह्यांचे बदलते स्वरुप व वाढती संख्या विचारात घेऊन तसेच लोहमार्ग पोलीस आयुक्तालय व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग यांचे अभिप्राय विचारात घेऊन नवीन लोहमार्ग पोलीस स्टेशन निर्मितीसाठी मनुष्यबळाचे सुधारित प्रमाणक/निकष तयार करण्यात आले आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१०१६१७१७२७८१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2023.10.16 17:21:22 +05'30'

**( कैलास गायकवाड )**
**सह सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (सेवा), साप्रवि, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई.
९) सर्व पोलीस आयुक्त/सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र.
१०) सर्व पोलीस आयुक्त, लोहमार्ग/सर्व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग.
११) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१४) सह सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
१५) वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१६) निवड नस्ती, पोल-३.

## परिशिष्ट - अ: पोलीस आयुक्त लोहमार्ग अंतर्गत नविन पोलीस ठाण्याकरीता मनुष्यबळाचे निकष/प्रमाणक

| अ.क्र. | कर्तव्ये | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी (PI/API ) | ३ | | | | | | ३ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | २ | | २ | ४ | ८ |
| ३ | संगणक कक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ५ | मुद्येमाल कारकुन | | | | १ | | १ | २ |
| ६ | लेखनिक/रायटर (प्रत्येक PI-१ HC, API-१ PC प्रमाणे) | | | | | ३ | ५ | ८ |
| ७ | हजेरी कारकुन / ड्युटी बटवडा | | | | | १ | १ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | डे बुक | | | | १ | | | १ |
| १० | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | १ | | १ | १ | २ | ५ |
| ११ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| १२ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ६ | ८ |
| १३ | VIP सुरक्षा / आरोपी पार्टी | | | | १ | २ | ३ | ६ |
| १४ | दहशतवाद विरोधी पथक (एटीसी) | | | १ | १ | | २ | ४ |
| १५ | हरवलेल्या महिला व मुले शोध पथक | | | १ | १ | २ | ४ | ८ |
| १६ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | | | | | १ | | १ |
| १७ | महिला मदत केंद्र /निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | | | २ | २ | २ | ४ | १० |
| १८ | न्यायालय व पैरवी | | | | १ | | २ | ३ |
| १९ | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | | | | | | १ | १ |
| २० | एल. आय. बी. / गोपनिय | | | | | १ | १ | २ |
| २१ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २२ | टपाल वाहक | | | | | | १ | १ |
| २३ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | १ | | १ | २ |
| २४ | ५० IPC (भाग १ ते ५) गुन्हयांकरीता १ तपास पथक<br>पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरिता १ PSI, १ ASI/HC व १ PC ची वाढ | | १ | २ | १ | १ | २ | ७ |
| २५ | १५० विशेष स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग ६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक<br>पुढील प्रत्येकी ५० गुन्हयांकरिता १ HC व १ PC ची वाढ<br>पुढील प्रत्येकी १५० गुन्हयांकरिता १ ASI/PSI ची वाढ | | १ | १ | १ | २ | २ | ७ |
| २६ | प्रत्येक रेल्वे स्टेशन/प्लॅटफॉर्म गस्तकरिता | | | | | १ | १ | २ |
| २७ | प्रत्येक दुरक्षेत्राकरिता (Out Post) | | | | २ | २ | २ | ६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | १,००० समन्स करीता<br>पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ PC | | | | | | १ | १ |
| २९ | २५० वॉरंट करीता<br>पुढील प्रत्येक २५० वॉरंट करीता १ PC | | | | | १ | १ | २ |
| ३० | २५० अर्ज चौकशी करीता<br>पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशीकरीता १ HC | | | | | १ | | १ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण / डी. बी. (दिवस/रात्रौ) | | २ | | २ | २ | २ | ८ |
| ३२ | आंतरराज्य तपास पथक | | | १ | १ | २ | २ | ६ |
| ३३ | प्रत्येक लोकल रेल्वेकरीता डब्यातील गस्त पथक | | | | | १ | १ | २ |
| ३४ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३५ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक(दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३६ | प्रत्येक १ फिक्स पाईट / Bag Dropping करिता | | | | | १ | १ | २ |
| ३७ | सायबर कक्ष | | | १ | | २ | २ | ५ |
| ३८ | RTPC | | | | | | १ | १ |
| ३९ | CCTV निगराणी | | | | | | २ | २ |
| ४० | सफाई कर्मचारी (कंत्राटी पदधतीने) | | | | | | | २ |
| | | **३** | **५** | **११** | **१७** | **३९** | **६८** | **१४५** |
| | रजा/प्रशिक्षण/आजारपण करीता १०% राखीव अमंलदार | | | | २ | ४ | ८ | १४ |
| | **एकुण आवश्यक मुनष्यबळ** | **३** | **५** | **११** | **१९** | **४३** | **७६** | **१५९** |

******

**परिशिष्ट ब: पोलीस अधीक्षक लोहमार्ग अंतर्गत नविन पोलीस ठाण्याकरीता मनुष्यबळाचे निकष/प्रमाणक**

| अ.क्र. | कर्तव्ये | PI | API | PSI | ASI | HC | PC | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे प्रभारी (PI/API ) | १ | १ | | | | | २ |
| २ | ठाणे अंमलदार व मदतनीस (दिवस/रात्रौ) | | | | १ | १ | ४ | ६ |
| ३ | संगणक कक्ष/ CCTNS (दिवस/रात्रौ) | | | | | २ | २ | ४ |
| ४ | पोलीस ठाणे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ५ | मुद्येमाल कारकुन | | | | १ | | १ | २ |
| ६ | लेखनिक/रायटर (प्रत्येक PI-१ HC, API-१ PC प्रमाणे) | | | | | १ | ३ | ४ |
| ७ | हजेरी कारकुन / ड्युटी बटवडा | | | | | १ | १ | २ |
| ८ | क्राईम रायटर /गुन्हे अभिलेख | | | | | १ | १ | २ |
| ९ | डे बुक | | | | १ | | | १ |
| १० | प्रतिबंधक कारवाई / सर्व्हेलन्स | | | १ | १ | १ | १ | ४ |
| ११ | पोलीस ठाणे गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| १२ | लॉकअप गार्ड (दिवस/रात्रौ) | | | | | २ | ६ | ८ |
| १३ | VIP सुरक्षा / आरोपी पार्टी | | | | १ | १ | ३ | ५ |
| १४ | दहशतवाद विरोधी पथक (एटीसी) | | | | | १ | २ | ३ |
| १५ | हरवलेल्या महिला व मुले शोध पथक | | | १ | १ | २ | ४ | ८ |
| १६ | सेवा/समाधान/स्वागतकक्ष | | | | | १ | | १ |
| १७ | महिला मदत केंद्र /निर्भया पथक (दिवस/रात्रौ) | | | १ | १ | १ | २ | ५ |
| १८ | न्यायालय व पैरवी | | | | | १ | २ | ३ |
| १९ | न्यायालय सुरक्षा (प्रत्येक कोर्टासाठी १ PC) | | | | | | १ | १ |
| २० | एल. आय. बी. / गोपनिय | | | | | १ | १ | २ |
| २१ | बिनतारी संदेश यंत्रणा (दिवस/रात्रौ) | | | | | | २ | २ |
| २२ | टपाल वाहक | | | | | | १ | १ |
| २३ | बारनिशी व माहिती अधिकारासाठी | | | | १ | | १ | २ |
| २४ | ५० IPC (भाग १ ते ५) गुन्हयांकरीता १ तपास पथक<br>पुढील प्रत्येक ५० गुन्हयाकरिता १ PSI, १ ASI/HC व १ PC ची वाढ | | १ | २ | १ | १ | २ | ७ |
| २५ | १५० विशेष स्थानिक कायद्यांर्गत गुन्हे (भाग ६) व आकस्मित मृत्यू यांकरीता १ तपास पथक<br>पुढील प्रत्येकी ५० गुन्हयाकरिता १ HC व १ PC ची वाढ<br>पुढील प्रत्येकी १५० गुन्हयाकरिता १ ASI/PSI ची वाढ | | १ | १ | १ | २ | २ | ७ |
| २६ | प्रत्येक रेल्वे स्टेशन/प्लॅटफॉर्म गस्तकरिता | | | | | १ | १ | २ |
| २७ | प्रत्येक दुरक्षेत्राकरिता (Out Post) | | | | १ | २ | २ | ५ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | १,००० समन्स करीता<br>पुढील प्रत्येक १००० समन्स करीता १ PC | | | | | | १ | १ |
| २९ | २५० वॉरंट करीता<br>पुढील प्रत्येक २५० वॉरंट करीता १ PC | | | | | १ | १ | २ |
| ३० | २५० अर्ज चौकशी करीता<br>पुढील प्रत्येक २५० अर्ज चौकशीकरीता १ HC | | | | | १ | | १ |
| ३१ | गुन्हे प्रकटीकरण / डी. बी. (दिवस/रात्रौ) | | | २ | २ | २ | २ | ८ |
| ३२ | आंतरराज्य तपास पथक | | | १ | १ | २ | २ | ६ |
| ३३ | प्रत्येक लोकल रेल्वेकरीता डब्यातील गस्त पथक | | | | | १ | १ | २ |
| ३४ | प्रत्येक चारचाकी वाहनाकरिता वाहन चालक (दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३५ | प्रत्येक दुचाकी वाहनाकरिता चालक(दिवस/रात्रौ) | | | | | १ | १ | २ |
| ३६ | प्रत्येक १ फिक्स पाईट / Bag Dropping करिता | | | | | १ | १ | २ |
| ३७ | सायबर कक्ष | | | १ | | २ | २ | ५ |
| ३८ | RTPC | | | | | | १ | १ |
| ३९ | CCTV निगराणी | | | | | | २ | २ |
| ४० | सफाई कर्मचारी (कंत्राटी पदधतीने) | | | | | | | २ |
| | | **१** | **३** | **१०** | **१४** | **३६** | **६३** | **१२९** |
| | रजा/प्रशिक्षण/आजारपण करीता १०% राखीव अमंलदार | | | | १ | ४ | ७ | १२ |
| | **एकुण आवश्यक मुनष्यबळ** | **१** | **३** | **१०** | **१५** | **४०** | **७०** | **१४१** |

*********